REGISTERED No. B3434.




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २ जुलै १९४७ अंक २७







पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी
९६ नारायण पेठ, पुणें २.




**साठे बिस्किटें**

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल गिऱ्हाइकास देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें!

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

-सर्व प्रांतांतील-
सुती — गरम — रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, दमडेरे बोळाजवळ, पुणें २

# विविध माहिती

**हिंदी यूनियनचें सुप्रीम कोर्ट**—पाकिस्तान आणि संयुक्त हिंदुस्थान अशी फाळणी झाल्यावर संयुक्त राज्याचें सुप्रीम कोर्ट अलाहाबादला राहील असें समजतें. ह्या कोर्टांत ११ न्यायाधीश काम करतील.

**बंगालमधील शिक्षण संस्थांची वाटणी**—सध्या कलकत्ता विद्यापीठाला जोडलेलीं ११६ कॉलेजें आहेत. बंगालची फाळणी झाल्यावर त्यांपैकी ३४ पाकिस्तानांत, २३ आसामांत आणि ५९ पश्चिम बंगालमध्यें रहातील. शाळांची वाटणी पुढील प्रमाणें होईलः– एकूण २,३०० शाळांपैकी १,२०० पाकिस्तानांत, ३०० आसामांत आणि ८०० कलकत्ता विद्यापीठाच्या कक्षेत रहातील.

**मुख्य प्रधानकीचें रेकॉर्ड**—कॅनडाचे मुख्य प्रधान, मि. मॅकेंझी किंग, हे मे १९४८ च्या आंत राजकारणांतून अंग काढून घेण्याचा संभव नाहीं. कारण, तेव्हां ते वॉलपोलच्या मुख्य प्रधानकीच्या दीर्घ मुदतीचें रेकॉर्ड मोडूं शकतील. वॉलपोल हा ग्रेट ब्रिटनचा मुख्य प्रधान २० वर्षें व ३२६ दिवस होता. मि. मॅकेंझी किंग अद्याप अविवाहित आहेत.

**किती सिगारेट वाया जाते?**—ग्रेट ब्रिटनमधील ७५% पुरुष व ६०% स्त्रिया धूम्रपान करतात. धूम्रपानी पुरुषांपैकी ७४% सिगारेट पितात. सिगारेटची सरासरी लांबी ३ इंच असते आणि टाकून दिलेलीं थोटकें ‡ इंच भरतात. म्हणजे २५% सिगारेट टाकून दिली जाते आणि उरलेल्यांतील फार तर ५०% ओढली जाते. ह्यावरून सिगारेटसमधील ९३,६५० टन तंबाखूपैकीं किती तंबाखू वाया जाते, हें लक्ष्यांत येईल. ग्रेट ब्रिटनमध्यें तंबाखूच्या आयातीवर जकात बसविण्यांत आली आहे, त्यामुळें धूम्रपानावर काय परिणाम झाला आहे, हें लवकरच दिसून येईल.

**संयुक्त प्रांतांत नव्या धरणाची योजना**—झाशी जिल्ह्यांतील सपरार नदीवर एक नवीन धरण बांधण्याची योजना संयुक्त प्रांत सरकार आणि ओर्च्छा संस्थान यांच्या दरम्यान मुकर झाली आहे. ह्या धरणामुळें ७२ मैल लांबीचा नवा कालवा तयार होऊन नवीन २४ हजार एकर जमीन बागाईन होईल.

**सिंधमधील नवें धरण** – सिंधू नदीच्या मुखाकडील भागांत बांधण्यांत यावयाच्या धरणासाठी सिंध सरकारनें १ कोटी रुपये किंमतीची अमेरिकन यंत्रसामुग्री मागविली होती. ही यंत्रसामुग्री नोव्हेंबर अखेर सिंधमध्यें येईल असा अंदाज आहे. यंत्राबरोबरच अमेरिकन यंत्रतज्ज्ञ सिंध पी. डब्ल्यु. डी. च्या नोकरांना शिक्षण देण्यासाठी येणार आहेत. ह्या धरणाला एकंदर खर्च २४ कोटी रुपये येणार असून त्यामुळें २० लाख एकर जमीन पाण्यासाठी भिजूं शकेल. ह्यापैकी निम्मी जमीन भात पिकविण्यासाठी उपयोगांत आणण्यांत येईल.

**मद्रासमधील गुरांच्या पैदाशींत सुधारणा**—मद्रास सरकारनें चांगल्या गाईंची व खोंडांची पैदास व्हावी म्हणून दर जिल्ह्यांत एक केंद्र उघडण्याचें ठरविलें आहे. एकेका केंद्रांत ५ उत्तम प्रतीचे वळू २ ते ३ महिने ठेवण्यांत येतील. ही योजना तीन वर्षेंपर्यंत चालू ठेवण्याचा सरकारचा विचार आहे.

**अणु-शक्तीच्या खनिजासाठी शोध**—हिंदुस्थानांत अणुशक्तीच्या उत्पादनासाठी उपयोग होणाऱ्या खनिजांचा शोध करण्याचें काम हिंदी-अणु-शक्ति-कमिटीनें हिंदुस्थानच्या भूगर्भ-संशोधन खात्याकडे सोंपविलें आहे.

**सिंधमधील शिल्लक तांदूळ**—सिंध सरकारनें तुटीच्या प्रांतांना देण्यासाठी आपणाजवळ २० हजार टन तांदूळ शिल्लक आहे असें जाहीर केलें आहे. ह्या वर्षी आतांपर्यंत सिंधमधून १,९५,००० टन तांदूळ बाहेर पाठविण्यांत आला. सिंधमधील गव्हाची सक्तीची वसुली मात्र समाधानकारक नाहीं. जून अखेर १ लक्ष, ३८ हजार टन गहू वसूल व्हावयाचा होता पण प्रत्यक्ष वसुली १,०५,०० टनच झाली आहे.

**कराचीचें नवीन नांव**—पाकिस्तानची राजधानी ह्या नात्यानें कराचीला जिनाबाद असें नवीन नांव देण्यांत येणार असल्याची वार्ता आहे. कराची कॉर्पोरेशनच्या पुढील बैठकींत मुस्लिम लीग पक्षातर्फें ह्याविषयीं ठराव मांडण्यांत येणार आहे.

**मुंबई शहरासाठी सिंधचा तांदूळ**—मुंबई शहरासाठी मिळविण्यांत आलेला ६ हजार टन सिंधी तांदूळ कराचीहून बोटीनें नुकताच मुंबईकडे धाडण्यांत आला.

★ प्रगति हीच लोकप्रियता ★
१९४६ साल सर्व दृष्टींनीं खडतर असतांही अनेक अडचणींना तोंड देऊन
वेस्टर्न इंडिया
नें
नवीन काम २ कोटींवर पूर्ण करून अभिमानास्पद प्रगति केली. निश्चित लोकप्रियतेची ही खूण आहे. आपले विमे याच कंपनींत उतरा व स्वास्थ्य मिळवा.
माहितीसाठी लिहा अथवा भेटा. ★ एजन्सीसाठी चौकशी करा.
—मॅनेजरः—
वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.,
सातारा.
पुणें शाखा कचेरीः—कर्वे वाडा, लक्ष्मी पथ, बेलबाग.

# अर्थ

बुधवार, ता. १ जुलै, १९४७





संपादक :
श्रीपाद् वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


प्रो. वा. गो .काळे

## सोनें, चलन आणि आंतरराष्ट्रीय व्यापार

### सोन्याच्या किंमती आणि चलनांची स्थिरता

आंतरराष्ट्रीय व्यापाराला एकमेकांच्या चलनविषयक अस्थिरतेमुळें उपसर्ग पोचूं नये, म्हणून ब्रेटन वुड्स परिषदेंत इंटर नॅशनल मोनेटरी फंड ह्या संस्थेची स्थापना करण्यांत आली. ह्या फंडांत सामील झालेल्या राष्ट्रांच्या चलनांचा सोन्याशी भाव ठरवून देण्यांत आलेला आहे. परंतु फंडाचे सभासद असलेल्या राष्ट्रांतही या भावापेक्षा अधिक दरानें सोन्याचा व्यापार होत असल्याचें फंडाच्या अधिकाऱ्यांना आढळून आल्यानें अशा व्यापाराला सभासद्-राष्ट्रांनीं उत्तेजन देऊं नये, त्याचा निषेध करावा, अशी शिफारस फंडातर्फे करण्यांत आली आहे. सभासद नसलेलीं राष्ट्रेंहि अशा प्रकारचा सोन्याचा व्यापार करीत आहेतच. ह्या शिवाय देशांतर्गत व्यापारांतही सोन्याचा भाव फंडानें बांधून दिलेल्या भावापेक्षा अधिक असल्याचें आढळून आलें आहे. सोन्याचा व्यापार अशा तऱ्हेनें चालल्यास आंतरराष्ट्रीय चलनांच्या स्थैर्यांत चलबिचल होणें अपरिहार्य आहे आणि हा स्थैर्याचा कांटा ढळला तर त्याचे अनिष्ट परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापारावर झाल्याखेरीज रहात नाहींत, असा अनुभव आहे. शिवाय, बांधून दिलेल्या किंमतीपेक्षा अधिक दरानें सोन्याचा व्यापार झाल्यास जगांतील सोन्याचा सांठा व्यापार-विषयक संस्थांच्या हातांतून व्यक्तींच्या हातीं जातो, हाहि मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यामुळें आंतरराष्ट्रीय चलनाच्या पाठीशीं जरूर असलेल्या सोन्याच्या साठ्यांत कमतरता उत्पन्न होते. देशांतर्गत व्यापारांत, ठरलेल्या किंमतींपेक्षा अधिक दरानें सोन्याची खरेदी-विक्री होत आहे. परंतु ह्या खरेदी विक्रीचा परिणाम म्हणून सोन्याची किंमत नवीन पातळीवर स्थिर झालेली नसल्यानें, फंडानें या व्यापाराला हरकत घेतलेली नाहीं. तथापि, (१) एकाद्या देशांतील अशा व्यापारानें दुसऱ्या एकाद्या देशांतील सोन्याच्या किमतीवर अनिष्ट परिणाम होत असेल तर, (२) अगर दुसऱ्या एकाद्या देशाला फंडाचा उपयोग करणें अशक्य होत असेल तर, फंडाचे अधिकारी ह्याही बाबतींत मार्गदर्शन करतील अशी अपेक्षा आहे.

### सोन्यावर नियंत्रण ठेवण्याची जरूरी कां भासली ?

इं. मो. फंडानें केलेली सूचना मुख्यतः मेक्सिको, बेल्जम, फ्रान्स ह्या फंडाच्या सभासद्-राष्ट्रांस आणि स्वित्सरलंडला लागू आहे. स्वित्सरलंड इं. मो. फंडाचा सभासद नाहीं. बँक ऑफ मेक्सिकोनें प्रथम सोन्याची नाणीं नफेबाजीनें विकण्यास प्रारंभ केला, तिचें युरोपांतील एका मध्यवर्ती बँकेनें अनुकरण केलें. सिरिया व इजिप्त ह्या देशांनींहि अमेरिकेंत व मेक्सिकोंत सोनें खरेदी करून इतर देशांस पुरवलें. ग्रेट ब्रिटननें स्वतः अधिकृत-रीत्या भारी दरानें सोनें विकलें नाहीं, तरी सोन्याच्या जिनसांच्या निर्गतीस उत्तेजन दिलें. ह्या जिनसांची किंमत बाजवीपेक्षा ५०% अधिक होती, असें म्हणतात. हिंदुस्थाननें मात्र खासगी रीतीनें आयात होणाऱ्या सोन्यास कायदेशीर रीतीनें प्रतिबंध केलेला आहे आणि चोरून सोन्याची आयात होऊं नये ह्यासाठी खबरदारी घेतली जात आहे. गेल्या वर्षी सोन्याचें जागतिक उत्पादन ९६ कोटी डॉलर्स किंमतीचें झालें त्याचा कांहींहि अंश चलनास आधार म्हणून ठेवलेल्या रिझर्वमध्यें दाखल झाला नाहीं, असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. ह्यावरून सोन्याच्या चोरट्या व्यापाराचें स्वरूप काय आहे ह्याची कल्पना येईल. इं. मो. फंडाची सूचना कितपत अमलांत आणली जाते, हें लवकरच कळून येईल.

### डॉलर्सचा तुटवडा पडण्याचें संकट

अमेरिकेच्या व्यापार खात्यातर्फे डॉलर्सच्या तुटवड्यासंबंधी एक पत्रक काढण्यांत आलें असून अमेरिकेशीं व्यापार करणाऱ्या देशांच्या दृष्टीनें तर तें महत्त्वाचे आहेच आणि अमेरिकन व्यापाराचें जगभर पसरलेलें जाळें लक्षांत घेतां जागतिक व्यापाराच्या दृष्टीनेंही त्याला तितकेंच महत्त्व आहे. १९४८ साल संपण्यापूर्वीच अमेरिकेपासून माल घेणाऱ्या देशांत डॉलर्सचा तुटवडा पडण्याचा संभव आहे असा इषारा खात्यातर्फे देण्यांत आलेला आहे. याचीं कारणें मुख्यतः दोन सांगण्यांत आलीं आहेत. एक असें कीं, अमेरिकन माल घेणारीं परराष्ट्रें त्यांचा डॉलर्सचा सांठा झपाट्यानें वापरीत आहेत; आणि दुसरें म्हणजे अमेरिकेंतील मालाच्या किंमती १९४४ सालापेक्षां आज ३० टक्क्यांनीं अधिक आहेत. देशांतर्गत व्यापारांत चलन हें जसें हिशोबाचें मध्यम म्हणून वापरलें जातें, त्याप्रमाणेंच राष्ट्रांच्या परस्पर व्यापारांत एकमेकांचें चलन वापरलें जातें. तेव्हां केवळ चलनाच्या दृष्टीनें विचार केला तर वरील कारणें बरोबर आहेत. पण आंतरराष्ट्रीय व्यापारांत चलनाच्या साधनानें जो हिशोब केला जातो तो खरोखर आयात-निर्यातीचा असतो. अर्थातच अमेरिकन माल आयात करणाऱ्या देशांत, आयाती-साठी याव्या लागणाऱ्या डॉलर्सचा तुटवडा पडण्याचें कारण आयात-निर्यात व्यापारांतच पहाणें योग्य ठरेल. डॉलर्सच्या तुटवड्याचें जें संकट अमेरिकन व्यापारी खात्याला दिसत आहे त्याचें खरें कारण असें असलें पाहिजे कीं अमेरिका जितका माल परदेशाहून आयात करते त्यापेक्षा अधिक माल निर्यात करीत असली पाहिजे. १९४६ सालीं अमेरिकेनें ९०० कोटि डॉलर्स किंमतीचा माल निर्यात केला. उलट, परदेशांतील माल फक्त ५०० कोटि डॉलर्सचा विकत घेतला. युध्दोत्तर काळांत अमेरिका पहिल्या प्रतीचें निर्यात करणारें राष्ट्र म्हणून पुढें आलें असल्यानें व त्या मानानें अमेरिकेंत आयात होत नसल्यानें डॉलर्सचा तुटवडा पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. ह्या बाबतींत ब्रिटिश फडणवीस, डॉ. डाल्टन, ह्यांनीं इंग्रजांना पुनः इषारा दिला असून आयात मालाच्या वापरांत आणखी काटकसर केल्याविना तरणोपाय नाहीं, असें स्पष्ट सांगितलें आहे.

### हिंदी जहाजांची वाढ कशी करावी ?

हिंदी दर्यावर्दी वहातुकीशीं संबंध असलेल्या धंदेवाईकांचें एक शिष्टमंडळ इंग्लंडला जाणार आहे. ह्या शिष्टमंडळाचे पुढारी श्री. वालचंद हिराचंद ह्यांचा इंडिअन मर्चंट्स चेंबरतर्फे मुंबईत सन्मान करण्यांत आला. त्यावेळीं श्री. वालचंद हिराचंद ह्यांनीं हिंदी जहाजांच्या वाढीच्या दृष्टीनें जहाजांच्या मालकांनीं इंग्लंडमध्यें नव्या बोटी बांधून घ्याव्या आणि त्यासाठी हिंदी सरकारनें त्यांना सहाय्य करावें असें सुचविलें. पांच वर्षांच्या अवधींत एकंदर हिंदी जहाजांचें वजन २० लाख टनांपर्यंत जाण्याच्या दृष्टीनें श्री. वालचंद यांनीं वरील सूचना आपल्या भाषणांत केली आहे.

# स्फुट विचार

## साखरेच्या मळीपासून पॉवर अलकोहल

हिंदुस्थान सरकारच्या योजना खात्यातर्फे " शुगर, अल्कोहल आणि फूड यीस्ट"संबंधीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. ह्या कमिटीनें साखरेच्या मळीपासून पॉवर अल्कोहल तयार करण्यासंबंधी कांहीं शिफारसी केलेल्या आहेत. सध्या हिंदुस्थानांत पॉवर अलकोहल तयार करणारे फक्त पांच कारखाने आहेत. त्यांपैकी दोन संयुक्त प्रांतांत व मुंबई, दक्षिण हैद्राबाद आणि म्हैसूर ह्यांत प्रत्येकी एक आहे. हिंदुस्थानांत वाहतुकीसाठी रेल्वे इतकाच, किंबहुना त्याहूनही अधिक उपयोग पेट्रोलवर चालणाऱ्या मोटारींचा करण्यांत येतो. रस्त्यावरील वहातुकीला लागणारें पेट्रोल हिंदुस्थानला मोठ्या प्रमाणावर आयात करावें लागतें. युद्धपूर्व हिंदुस्थानला १० कोटी गॅलन पेट्रोल वहातुकीसाठी लागत होतें. ह्यापैकी फक्त १ कोटी, ७० लाख गॅलनच हिंदुस्थानांत निर्माण करण्यांत येत होतें. बाकीचें आयात करावें लागत असे व लागतें. आयात होणाऱ्या पेट्रोलपैकी ब्रह्मदेशाकडून ७४ टक्के पेट्रोल येत असे. ह्या परिस्थितीवरून वहातुकीला लागणारें जळणाचें तेल स्वतः निर्माण करणें हिंदुस्थानास आवश्यक आहे, हें दिसून येईल. युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानांतील प्रांतिक व इतर रस्ते वाढणार असल्यानें वहातुकही वाढेल असा अंदाज आहे. ह्या वाढीचा हिशेब लक्षांत घेतां, हिंदुस्थानला दरवर्षी १२ कोटी गॅलन पेट्रोल लागेल असें दिसतें. पॉवर अल्कोहल निर्माण करण्यासाठी जो कच्चा माल उपयोगी पडतो त्यांत साखरेच्या कारखान्यांतून वाया जाणारी मळी ही सर्वोत्कृष्ट आहे. हिंदुस्थान हा साखर उत्पन्न करणाऱ्या जगांतील देशांतील एक प्रमुख देश असून, साखर कारखान्यांतील मळीचा उपयोग पॉवर अलकोहल मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्यासाठी आपणास करून घेतां येईल. हिंदुस्थानांतील साखर कारखान्यांतून दरवर्षी सुमारें ४ लाख टन मळी निघूं शकेल. सध्या त्यांपैकी फक्त १½ लाख टनाचा स्पिरिट, अलकोहल वगैरे निर्माण करण्यासाठी उपयोग करण्यांत येतो. बाकीच्या मळीचा खत, जळण ह्यांसाठी उपयोग करण्यांत येतो अगर ती वाया जाते. कमिटीनें अशी शिफारस केली आहे कीं पेट्रोलमध्यें २० टक्के पॉवर अल्कोहल मिसळलें तर मोटारींना ह्या मिश्रणाचा उपयोग पेट्रोलसारखाच होईल. पॉवर अल्कोहल मिसळलेल्या पेट्रोलची किंमत शुद्ध पेट्रोलपेक्षा दर गॅलनमागें १½ ते २ आणे इतकीच अधिक होईल.

## नव्या इंजिनिअरिंग कॉलेजची स्थापना

पुणें येथील महाराष्ट्र टेकनिकल एज्युकेशन सोसायटीच्या विश्राम बाग ( सांगली ) येथील नव्या इंजिनिअरिंग कॉलेजास मुंबई विश्वविद्यालयाची मान्यता मिळून तें ता. २३ जून रोजीं सुरूहि झालें आहे. आतांपर्यंत खासगी प्रयत्नांनीं अनेक शाळा-कॉलेजें निघालीं, परंतु स्थापत्य विद्यालयासारखी अत्यंत आवश्यक तथापि खर्चाची संस्था काढण्याची कल्पनाहि मूळ धरूं शकली नाहीं, इतकें तें अवघड काम आहे. श्री. धोंडूमामा उर्फ धों. कृ. साठेप्रभृति मंडळींनीं अत्यंत चिकाटीनें व परिश्रमानें म. टे. ए. सोसायटीची स्थापना करून तिचेमार्फत स्थापत्य विद्यालयाची कल्पना सत्यसृष्टींत उतरविली, इतकेंच नव्हे तर तिला प्रिं. गोखले, श्री. एस. बी. जोशी, इत्यादि नामवंत, निष्ठावंत आणि राष्ट्रीय वृत्तीच्या आणि अनुभवी स्थापत्य शास्त्रज्ञांचें प्रत्यक्ष अध्यापन कार्यांत सहकार्य मिळाविलें, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. आज स्थापत्य विशारदांस मागणी असून त्यांना वेतनहि भरपूर मिळूं शकतें, ही गोष्ट संस्थेच्या ध्येयाच्या दृष्टीनें अगदींच गौण आहे. हिंदी स्थापत्य शास्त्रज्ञांनीं हिंदी यंत्रसामुग्रीचे उत्पादनास प्रोत्साहन दिलें पाहिजे, हिंदी गरजांस अनुसरूनच यंत्रसामुग्री उपयोगांत आणली पाहिजे, परदेशी पदव्यांचें फाजील स्तोम माजवितां कामा नये, इत्यादि राष्ट्रीय विचारांची पार्श्वभूमि असलेल्या मंडळींच्या चालकत्वासाठी कॉलेज चालणार आहे, ही अत्यंत अभिनंदनीय गोष्ट आहे. हिंदुस्थानाच्या आर्थिक व औद्योगिक उद्धारास अशा वृत्तीच्या स्थापत्य विशारदांचें अतिशय बहुमोल सहाय होणार आहे आणि त्या दृष्टीनें म. टे. ए. सोसायटीनें फारच योग्य उपक्रम केला आहे. तो सत्वर पूर्णपणें यशस्वी होण्यास जनतेनें त्यास आपण होऊन हातभार लावावा. मुंबई सरकारनें अहमदाबाद येथें इंजिनिअरिंग कॉलेज सुरू करण्याचें ठरविलें, त्याला दीर्घ काळ लोटूनहि त्या कॉलेजाच्या स्थापनेचा अद्याप पत्ता नाहीं. श्री. धोंडूमामा साठे प्रभृतींनीं केवळ खासगी प्रयत्नांनीं संस्था स्वार्थत्यागपूर्वक उभारण्यांत दाखविलेल्या धडाडीचें व चिकाटीचें कौतुक वाटल्याविना रहात नाहीं.

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.

अखिल हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध व अग्रेसर अशा वरील महाराष्ट्रीय कंपनीनें १९४६ सालीं २कोटि रुपयांचेवर काम पुरें केलें, त्याच्या वार्षिक हप्त्यांची रकम ११ लक्ष रुपयांवर भरते. आयुर्विमा निधींत ३५ लक्ष रुपयांची भर पडली असून तो निधी आतां २¾ कोटि रुपयांहून अधिक झाला आहे. कंपनीजवळील रोख्यांची बाजारभावानें होणारी किंमत २ कोटि, ८२ लक्ष रुपये असूनहि हिशेबाच्या पुस्तकांत ती २ कोटि, ६३ लक्ष रुपयेच दाखविलेली आहे. कंपनीच्या वार्षिक सभेंत डॉ. मो. ना. आगाशे ह्यांनीं केलेल्या भाषणाचा मथितार्थ आजच्या अंकांत दुसरीकडे दिला आहे,त्यावरून कंपनीच्या प्रगतिपर परंतु सावधगिरीच्या अशा योग्य धोरणाची कल्पना येईल. वेस्टर्न इंडियाचीं सर्व वैशिष्ट्यें कायम असून ती युद्धोत्तर कठीण परिस्थितींतहि तिच्या पूर्वीच्या लौकिकास साजेल अशा समाधानकारक गतीनें प्रगति करीत आहे.

## युवर ओन प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कं. लि.

वरील, मुंबई प्रांतांतील अनेक दृष्टींनी अग्रेसर प्रॉव्हिडंट कंपनीनें १९४६ सालीं ३ लाखांचेवर काम पुरें केलें आणि लाइफ फंडांत १७ हजारांचेवर भर घालून त्याची रकम ५१ हजारांपर्यंत नेली. प्रॉव्हिडंट कंपन्यांच्या विम्याची कमाल रकम कायद्यानेंच मर्यादित केलेली असल्यामुळें, त्यांच्या कामाच्या आकड्यांची तुलना बिगर प्रॉव्हिडंट कंपन्यांच्या आकड्यांशीं करणें चुकीचें होईल. "युवर ओन" नें मुंबई प्रांतांतील दुसऱ्या इतर कोणत्याहि प्रॉव्हिडंट कंपनीपेक्षा १९४५ सालीं ज्यास्त काम मिळविलें होतें आणि १९४६ सालींहि तिनें ही प्रगति कायम ठेवली आहे, ही गोष्ट महत्वाची आहे. " युवर ओन "च्या पॉलिसीची सरासरी रकम ४२५ रु. वरून ५२५ रु. पर्यंत वाढली आहे आणि ती ९०० रुपयांच्या शक्य तितक्या नजीक नेण्याचा चालकांचा प्रयत्न आहे. कंपनीचे काटकसरी व व्यवहारदक्ष मॅनेजिंग डायरेक्टर श्री. एस. एन. कोल्हटकर, बी. ए ह्यांनीं १९४६ सालींहि कोणत्याहि तऱ्हेचा मेहेनताना घेतलेला नाहीं ह्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख डायरेक्टर बोर्डानें आपल्या रिपोर्टांत केला आहे. कंपनीचें धोरण नेहमी पायाशुद्ध राहील, ह्या आमच्या अपेक्षेचा उल्लेख गेल्या वर्षी आम्हीं केला होता. १९४६ चा ताळेबंद त्या अपेक्षेस धरूनच आहे.

# दुकान व कचेरी ह्यांतील नोकरांचे कायद्याबाबत दोन महत्त्वाच्या सूचना

( लेखक :— श्री. स. वा. दातार, बी. एस्सी, एल्एल्. बी. )

## दोन अत्यावश्यक सुधारणा

दुकानें व व्यावसायिक कचेऱ्या ह्यांमध्यें काम करणाऱ्या नोकर-वर्गाचे हितसंरक्षणार्थ केलेल्या कायद्याची अंमलबजावणी कशी होत आहे ? व त्या कायद्यांत कांहीं सुधारणा आवश्यक आहेत काय ? ह्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी एक समिति सध्या सरकारनें नेमलेली आहे. सदरचा कायदा स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीनें पुढील दोन सूचना त्या समितीस कराव्याशा वाटतात : ( १ ) कोणाहि नोकरास कामावरून काढण्यापूर्वी त्यास कांहीं ठराविक मुदतीची नोटीस देणें आवश्यक असल्याचें ह्याच कायद्यांत ग्रथित करून ठेवावें, व ( २ ) नोकरांचा थकलेला किंवा अडकविलेला पगार सुलभ व स्वस्त रीतीनें वसूल करून देण्याचा मार्गहि ह्याच कायद्यानें आंखून द्यावा.

### नोटीस

नोकरास कामावरून काढावयाचे झाल्यास त्यास कांहीं ठराविक मुदतीची नोटीस आगाऊ देणें आवश्यक असतें. हिंदुस्थानांतील प्रचलित कायद्यास हा संकेत मान्य आहे, परंतु ह्या तऱ्हेचें स्पष्ट कलम कोणत्याहि विद्यमान कायद्यांत नमूद केलेलें आढळणार नाहीं. हा संकेत नोकरीच्या करारांत अंतर्भूत असल्याचें समजलें जातें. नोकरीचा करार लेखी असो वा तोंडी असो, नोकरास तडकाफडकी व हवें तेव्हां कामावरून काढणें कायद्यास व न्यायबुद्धीस मान्य नाहीं. हिंदुस्थानांतील न्यायालयें हीं कायदा व न्यायबुद्धि ( लॉ अ‍ॅन्ड इक्विटी ) ह्या दोन्हींचीहि संरक्षक समजलीं जातात. एक काम संपावयाचे झाल्यास तें संपण्यापूर्वी दुसरें काम शोधून हस्तगत करून ठेवण्यासाठी खटपट करावयास नोकराला अवधी मिळाला पाहिजे. मालकानें नोकरास मन मानेल तेव्हां काढावें व त्याच्या संसाराची वावडी वाऱ्यावर सोडून द्यावी, हें कायदा व न्यायबुद्धि ह्या दोहोंचेहि विरुद्ध आहे. परंतु अशा तऱ्हेचे निःसंदिग्ध उल्लेख हिंदी कायद्यांत आढळणार नाहींत.

### इंग्रजी कायदा

हिंदी कायद्यांत नसले तरी इंग्लंडच्या सर्वसाधारण कायद्यांत ( कॉमन लॉ ) ह्याबाबत स्पष्ट विचार नमूद केलेले आहेत. हॉल्सबरीज लॉज ऑफ इंग्लंड ह्या प्रमाणभूत विस्तृत ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तींतील २२ व्या विभागांत पृष्ठ १४५–५० वर २३५ ते २४९ ह्या परिच्छेदांत मालक व नोकर ह्यांच्या संबंधांतील एतद्विषयक कायदा आढळून येईल. हिंदी कायदा आवश्यक तेव्हां इंग्रजी कायद्याचा आधार घेतो आणि तत्वनिर्णयाचे बाबत तर इंग्रजी कायद्याचें मार्गदर्शन हिंदी न्यायालयें नित्य स्वीकारीत असतात. म्हणून ह्या बाबतींतील इंग्रजी तरतुदी काय आहेत त्याचें येथें थोडक्यांत वर्णन दिलें आहे.

लेखी अगर तोंडी करारानें सर्वसामान्य पद्धतीनुसार मुदत न घालतां जेव्हां एकादा नोकर कामावर ठेवला जातो तेव्हां अशा नोकराचा कामाचा करार सामान्यतः वर्षा वर्षाचा आहे असें गृहित धरलें जातें. त्या नोकरास दरमहा अगर दर आठवड्यास पगार देण्याची पद्धति असली तरी सुद्धां नोकरीचा करार एका वर्षाचाच आहे असें मानलें जातें. पगाराची पद्धत कशी आहे ह्यावर नोकरीच्या कराराची मुदत अवलंबून धरली जात नाहीं.

### नोटिशीची मुदत

वर वर्णन केलेला सर्वसामान्य नोकरीचा एका वर्षाचा करार रद्द करावयाचा असल्यास त्या करारांत ठरलेल्या मुदतीची नोटीस नोकरास द्यावी लागते. किती मुदतीची नोटीस द्यावी हें जर करारांत नमूद केलेलें नसेल तर पुष्कळ ठिकाणीं जे रिवाज अथवा प्रघात ( यूसेजेस ) प्रचलित असतात त्यांचेप्रमाणें नोटीशीची मुदत ठरविण्यांत येते. इंग्लंडमध्यें पुष्कळ ठिकाणीं एका वर्षाच्या नोकरीच्या कराराचे बाबत पगाराची पद्धत महिनेवारीवर असेल तर एका संपूर्ण महिन्याची नोटीस देण्याचा प्रघात आहे. जर असा प्रघात नसेल तर वाजवी ( रीझनेबल ) मुदतीची नोटीस द्यावी लागते.

### वाजवी मुदत

नोकरीच्या स्वरूपाप्रमाणें वाजवी मुदत ही निरनिराळी असणें साहजिक आहे. हॉल्सबरीच्या ग्रंथांत नमूद केलेले कांहीं दाखले ह्या दृष्टीनें बोधप्रद व मार्गदर्शक असल्याकारणानें त्यांपैकीं निवडक असे कांहीं पुढें दिले आहेत. ( १ ) वृत्तपत्राच्या संपादकास कामावरून काढावयाचें झाल्यास सहा पासून बारा महिन्यांची नोटीस आवश्यक ठरविण्यांत आली आहे तर ( २ ) चित्रपटाचे संयोजकास एकाच महिन्याची नोटीस पुरी मानली गेली आहे. ( ३ ) वृत्तपत्राचे सह वा उपसंपादकास सहा महिने, ( ४ ) प्रवासी प्रचारकास व विक्रेत्यास तीन महिने, ( ५ ) कचेरींतील अधिकारी व कारकून वर्ग ह्यांस तीन महिने, ( ६ ) मुलांची सांभाळकर्ती वा शिक्षिका आणि शाळा मास्तर ह्यांना तीन महिने, ( ७ ) मोठ्या हॉटेलांतील व्यवस्थापकास तीन महिने, ( ८ ) लोंकरी कपड्याच्या फिरत्या प्रचारकास एक महिना, ( ९ ) साप्ताहिक वृत्तपत्रास लेख पुरविणाऱ्या पत्रपंडितास एक महिना, ( १० ) जाहिराती व वर्गणीदार मिळविणाऱ्या प्रचारकास एक महिना, ( ११ ) दुकानदाराच्या मदतनिसास एक महिना, ( १२ ) शेतकामावरील देखरेखनिसास एक महिना, इत्यादि मुदतीच्या नोटीसा वाजवी असल्याचें त्या त्या प्रकरणांतील परिस्थितीवरून इंग्लिश न्यायालयांनीं ठरविलेलें आहे. सारांश, नोटीस न देतां एकदम एकाद्या नोकरास कामावरून काढून टाकणें इंग्रजी वा हिंदी कोणत्याच कायद्यास संमत नाहीं. नोकरास कामावरून काढावयाचे तर त्यास कमींतकमी एका पूर्ण महिन्याची तरी नोटीस द्यावी अथवा नोटिशीच्या मुदतीचा पगार रोख द्यावा असा इंग्लिश कायद्यांत लिखित नियम असून हिंदी कायद्यांतहि तोच अलिखित संकेत पाळला जातो.

### नोटीशीबाबत स्पष्ट कलमें घालावींत.

हिंदी कायद्यांतील सांप्रतच्या अलिखित संकेता ऐवजी आतां दुकान व कचेरी नोकरांच्या कायद्यांत ह्या बाबतचीं स्पष्ट कलमें घालणें अत्यंत जरूरीचें आहे. कोणत्याहि प्रकारच्या दुकान व कचेरी नोकरास निदान पूर्ण एक महिन्याची तरी नोटीस दिल्याशिवाय अथवा त्या मुदतीचा जादा रोख पगार दिल्याशिवाय कामावरून काढतां येऊं नये. नोटीशीला लागू होणाऱ्या अन्य नियमांप्रमाणें ही नोटीस द्यावयाची ती पगाराचा नवा महिना सुरू होण्यापूर्वी द्यावी ; आधेमधें दिलेली नोटीस पूर्ण महिन्याची होणार नाहीं व म्हणून कायदेशीर ठरणार नाहीं असा स्पष्ट उल्लेख कायद्यांत करावा. एकाद्या महिन्याच्या पांच तारखेस म्हणजेच आधेमधें केव्हांतरी नोकरास कामावरून कमी केलें तर त्या महिन्याचा पगार तर द्यावा लागावाच व शिवाय नोटीशीच्या पुढील पूर्ण महिन्याचाहि पगार द्यावा लागावा. आजहि प्रचलित कायदा हेंच मानतो. परंतु, अशा आशयाचीं स्पष्ट कलमें आतां ह्या कायद्यांत

ग्रथित करण्यांत यावीत. लेखी स्वतंत्र करार करून नोटिशीची ही मुदत वाढविण्यास मोकळीक असावी. परंतु कमी करण्यास मात्र असूं नये. नोकरीच्या कोणत्याहि करारांतील नोटिशीची मुदत कमी करणारा भाग नियमबाह्य ठरविण्यांत यावा.

### पगारवसुलीची स्वस्त व त्वरित सोय

दुकान व कचेरी नोकरांचा, मालकांनीं अडवून धरलेला पगार त्यांना त्वरित मिळवून देण्याचे मार्गहि ह्या कायद्यांत अंतर्भूत करण्यांत यावेत. ह्या वर्गास मालक आपल्या लहरीनुसार काढून तर टाकतातच व शिवाय त्यांचे पगारहि अडकवून ठेवतात व बुडवितात. पगारासाठी नित्याच्या दिवाणी पद्धतीचे दावे लावावयाचे तर खर्चाचा व वेळापव्ययाचा प्रश्न उभा राहतो. ह्या अडचणी दूर करण्यासाठी सुलभ योजना करणें न्याय्य व हितप्रद होईल.

### 'पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टा' चा दाखला

फॅक्टरी ॲक्ट ज्यांना लागू पडतो अशा कारखान्यांत काम करणाऱ्या नोकरांना मालकांनीं अडकवलेला पगार मिळविण्यासाठी सुलभ असा मार्ग 'पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट' ( १९३६ सालचा ४ था कायदा ) याचे अन्वयें सरकारनें करून दिलेला आहे. दुकान व कचेरी नोकरांसाठी त्याच पद्धतीवर सोय करून देण्याकरितां शॉप ॲक्टांतच, ह्यासंबंधाचीं कांहीं अधिक कलमें ग्रथित करण्यांत यावीं, अशी दुसरी आग्रहाची सूचना आहे. पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टखालीं कारखान्यांतील कोणाहि एका अथवा अनेक नोकरांना संयुक्तपणें फक्त आठ ( आतां दहा ) आण्यांचें तिकिट लावून सिटी मॅजिस्ट्रेटकडे अर्ज करतां येतो व थकलेला अथवा अडकाविण्यांत आलेला पगार मिळवून देण्याची मागणी अथवा विनंति करतां येते. अशा अर्जासाठी बजावणीचा खर्च ( प्रोसेस फी ) सुद्धां भरावा लागत नाहीं. सिटी मॅजिस्ट्रेट त्वरित ( समरी ) पद्धतीनें अशा अर्जांचा निर्णय लावतात. मासिक २००रुपयांपेक्षा अधिक पगाराचीं प्रकरणें मात्र ह्या पद्धतीनें निर्णिलीं जात नाहींत. हुबेहुब ह्याच स्वरूपाची योजना दुकान व कचेरी नोकरांसाठीहि आंखून ती या कायद्यांत ग्रथित करणें फार हिताचें होईल. फारतर मॅजिस्ट्रेट ऐवजी सबजज्ज कोर्टास हे निर्णय देण्याचे अधिकार दिले म्हणजे मॅजिस्ट्रेट कोर्टाचें काम फार वाढणार नाहीं.

वर सुचविलेल्या दोन अत्यावश्यक सुधारणा ह्या कायद्यांत समाविष्ट केल्या तर हा कायदा स्वयंपूर्ण होऊन दुकान व कचेरी नोकरांच्या जीवनास स्थैर्य व सुरक्षितता आणून देण्यास मोठीच मदत होईल, अशी खात्री वाटते. समितीनें व सरकारनें ह्या सूचना जरूर स्वीकाराव्या, अशी आग्रहाची विनंति आहे.

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

साप्ताहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २४।६।४७ | बुधवार २५।६।४७ | गुरुवार २६।६।४७ | शुक्रवार २७।६।४७ | सोमवार ३०।६।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४१७–८; २५२७–८ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा हिफर्ड | ३० | १९८० | १९५० | १९९२—८ | १९८० | १९९० |
| ६३८; ४५७–८ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३९१—८ | ३८६ | ३९३ | ३९२—० | ३९३—८ |
| ६५; ३६–४ | ०–८–०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २८—४ | २८ | २८ | २८—८ | २८—१२ |
| ७१-४; ४४–१० | ०–१४–०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३४–१५ | ३४—६ | ३४—४ | ३४–१३ | ३५—४ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| १२७७–८; २२१२–८ | ४०–०–०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १०९० | १०६५ | ११०२—८ | ११०१—४ | ११४० |
| ११८०;० ६५८ | १३–०–०S | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६४९ | ६४५ | ६५६ | ६५४ | ६५९ |
| ९९९; ६६० | २७–०–० | मे | स्वदेशी | १०० | ६४८ | ६४२ | ६५३ | ६५५ | ६५८ |
| ५६७; ३९८ | २–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ३०७ | ३०४ | ३१० | ३१८ | ३१९ |
| ५५२; ३१४ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ३०९ | ३०७ | ३१० | ३१३ | ३२४ |
| ५७१; ३२३ | १२–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३३१ | ३३२ | ३३९ | ३३६—८ | ३४० |
| ५९४; ३२५–८ | ४–०–०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३५४ | ३४२ | ३५९ | ३५८ | ३६२—८ |
| ७-४-६; ४-८-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ४—४ | ४—४ | ४—४ | ४—५ | ४—५ |
| २९-१; १६-१२ | ०–१३–९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १६—१ | १५–१२ | १६—४ | १६—७ | १६–१२ |
| ६-११-६; ३-३-६ | ०–२–६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३—०–६ | ३—०–० | ३—०–६ | ३—१ | ३—१ |
| १०९२–८; ७३५ | ४१–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५८१—४ | ५७०—८ | ५९१—४ | ५९२—८ | ६०५ |
| २७८; २२५ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १७० | १६९ | १६९—८ | १६९—४ | १७० |
| ३७५; २४० | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २७० | २६८ | २६९ | २६९ | २७५ |
| ९१०; ६०५ | १०–०–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४७० | ४५७—८ | ४९२—८ | ४७२—८ | ४८० |
| ६०-१० ३६-१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३१—५ | ३१—५ | ३२—० | ३१–१० | ३१–११ |

**परराष्ट्रांची मालमत्ता जप्त करा**—ब्रह्मदेशच्या कम्युनिस्ट पक्षानें ब्रह्मी सरकारला उद्देशून असें पत्रक काढलें आहे कीं ब्रह्मदेशांतील परराष्ट्रांची मालमत्ता जप्त करण्यांत यावी आणि शेती व उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें.

**मोटार वहातुकीचें राष्ट्रीयीकरण**—ब्रह्मदेशचें सरकार मोटार वहातूक धंद्याच्या राष्ट्रीयीकरणाच्या योजनेचा विचार करीत आहे असें अधिकृत रीत्या जाहीर करण्यांत आलें आहे.

**युरोपिअन राष्ट्रांना मदत**—अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मि. मार्शल यांनीं सुचविलेल्या युरोपमधील राष्ट्रांना आर्थिक मदत देण्याच्या योजनेवरील चर्चेत रशिया भाग घेणार आहे. फ्रेंच व ब्रिटिश परराष्ट्रमंत्र्यांनीं रशिअन सरकारला यासाठी आमंत्रण दिलें होतें.

**नेपाळमध्यें हवामानाच्या वेधशाळा**—हिंदुस्थान सरकारनें नेपाळमध्यें सहा पहिल्या प्रतीच्या हवामानाच्या वेधशाळा उभारण्याचें ठरविलें आहे, असें समजतें.

# भोर स्टेट बँक लि. च्या शिरवळ शाखेचें उद्घाटन

शुक्रवार ता. १३ जून रोजीं सुमुहूर्तावर भोर स्टेट बँक लि. च्या शिरवळ शाखेचा उद्घाटन समारंभ भोरचे श्रीमंत राजेसाहेब यांचे हस्तें शिरवळ येथें थाटानें पार पडला. समारंभाकरता सरकार वाड्यापुढें विस्तीर्ण सुशोभित मंडप उभारण्यांत आला होता. श्री. राजेसाहेब येतांच बँकेच्या डायरेक्टर मंडळींनीं श्री. राजेसाहेबांचें स्वागत केलें. स्वागतपर पद्यानंतर बँकेचे अध्यक्ष दिवाण श्री. ल. र. साने, बी. ए., एलएल. बी., यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत भोर स्टेट बँकेनें केवळ तीनच वर्षांत केलेल्या विशेष प्रगतीचा धावता आढावा घेतला. सुरवातीसच सव्वा लाख रुपयांचे शेअस खपले गेले व खेळत्या भांडवलांत वारंवार भर पडत जाऊन मागील सालचे अखेरीस बँकेकडील खेळतें भांडवल अकरा लाखांपर्यंत चढलें, आणि सर्व व्यवहारांतील नफा जमेस धरून पन्नास हजारांचेवर गंगाजळी निर्माण झाली. पाली येथें यापूर्वींच शाखा उघडण्यांत आलेली होती. बँकेची मनिषा पुढेंमागें पुण्यासुद्धां शाखा काढावी अशी आहे. नंतर बँकेचे उपाध्यक्ष, श्री. वा. पुं. वर्दे, बी. कॉम. ह्यांच्या अनुपस्थितींत बँकेचे डायरेक्टर श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम, यांनीं सांगितलें कीं हिंदुस्थानला बँकिंग हा धंदा नवा नसून ऐतिहासिक ग्रंथांतून मगध देशाची हुंडी ब्रह्मदेशांत आणि सौराष्ट्राची हुंडी दक्षिणेंत चालत असल्याचे उल्लेख आढळतात. युरोपांत गेल्या तीन शतकांत औद्योगिक क्रांति झाली त्याबरोबर मूळचें साधें स्वरूप पालटून बँकिंगच्या धंदाचें स्वरूप पार बदललें असून तें विशेष गुंतागुंतीचें झालें आहे व त्या दृष्टीनें आपल्याकडे धंद्यांतल्या तज्ज्ञ माणसांची वाण नेहमी आढळते. संस्थानमधील नागरिकांनीं आपलीं मुलें बाहेर बँकिंग व इतर धंद्यांचें शिक्षण घेण्यास पाठवलीं पाहिजेत व पर्यायानें स्वतःवर उपकार करून घेऊन आपल्या समाजाचें हितही वाढविलें पाहिजे. नंतर श्रीमंत राजेसाहेबांनीं आपलें बँकेच्या कामाकडे नेहमी लक्ष असून बँकेनें थोडक्या अवधींत केलेल्या प्रगतीबद्दल आपणांस विशेष समाधान वाटत असल्याचें व्यक्त केलें. श्री. चंदनमल राठी यांनीं आभारप्रदर्शन केल्यावर सर्वांस पानसुपारी वाटण्यांत आली. समारंभाचे वेळींच बँकेच्या शिरवळ शाखेंत पन्नासाचेवर खातीं उघडण्यांत येऊन पाऊण लाखापर्यंत ठेवी जमल्या.




**पहिली रांगः**—१ श्री. कुळकर्णी मामलेदार, २ न. मू. नानासाहेब थोपटे, ३ श्री. म. व्यं. शिंगरे, ४ दिवाण श्री. ल. र. साने (अध्यक्ष), ५ श्रीमंत राजेसाहेब, भोर, ६ श्री. व. वि. लोणकर, ७ श्री. वि. वि. बावडेकर, ८ श्री. चंदनमल राठी, ९ श्री. चुनीलाल रावळ.

**मागील रांगः**—३ श्री. आगाशे ( असि. मॅनेजर ) ४ श्री. काळे ( मॅनेजर )

**१०२ वर्षे वयाच्या लेडी सूनाबाईचा मृत्यु**—लेडी सूनाबाई तेमुळजी नरिमन ह्या आपल्या वयाच्या १०२ व्या वर्षी नुकत्याच मरण पावल्या. त्यांचे पती, सर तेमुळजी नरिमन हे १९४० सालीं निवर्तले. सर तेमुळजींच्या ५ व्या वर्षी त्यांचा सूनाबाईशीं विवाह झाला व ८७ वर्षे त्या दोघांनीं संसार केला.

**पंजाब नॅशनल बँकेची कचेरी**—पंजाब नॅशनल बँकेनें आपली मुख्य कचेरी लाहोरहून दिल्लीला नेण्याचें ठरविलें आहे. ह्यास लाहोर हायकोर्टानें मान्यता दिली आहे.

**श्री. दांडेकर ह्यांची निवड**—पुनर्घटित इंडियन अकौन्टन्सी बोर्डावर मद्रास प्रांत, हैद्राबाद, म्हैसूर, त्रावणकोर व कोचीन ह्या गटातर्फे निवडलेल्या तिघा ऑडिटरांत मद्रासचे श्री. जी. एम. दांडेकर ह्यांचा पहिला अनुक्रम आहे.

**अमेरिकेचें चीनला कर्ज**—जून १९४७, अखेर ५० कोटी डॉलर्सचें कर्ज अमेरिका चीनसाठी मंजूर करील असें समजतें. ह्याशिवाय चीनमधील अमेरिकन मिशनकडे चिनी लष्करी वरिष्ठांनीं ६ कोटी, ५० लाख डॉलर्सचें लष्करी साहित्य उधारीवर मागितलें आहे. चीनमध्यें चालू असलेल्या यादवीमुळें चिनी सरकारी लष्कराला तातडीच्या गरजा भागविण्यासाठी अमेरिकेच्या तोंडाकडे पहावें लागत आहे.

**कोळशाची किंमत वाढणार नाहीं**—दगडी कोळशाची किंमत स्थिर करण्याचा हिंदुस्थान सरकार विचार करीत आहे. झरिया कोळशाच्या खाणींतील मजुरांना दिलेल्या सवलतींमुळें कोळशाची किंमत दर टनामागें ३ ते ४ रु. वाढणार असल्याची बातमी चुकीची आहे असें प्रसिद्ध झालें आहे.

# वेस्टर्न इंडियाची वार्षिक सभा

अध्यक्ष, डॉ. मो. ना. आगाशे, एम. बी. बी. एस. ह्यांचें भाषण

१९४५ सालीं आपल्या कंपनीचें एकूण काम रु. १,८६,७५, २०७ इतकें झालें होतें. तें १९४६ सालांत २,००,८५,०९५ रुपयांवर गेलें. म्हणजे गतवर्षीपेक्षां चालू सालीं सुमारें चौदा लाखांची नवीन कामांत वाढ झाली आहे.

### विमा कंपन्यांची मातृसंस्था

आपल्या कंपनीच्या पांच वर्षांतील कामाचा जर आढावा घेतला तर असें दिसून येईल कीं एका पद्धतशीर रीतीनें कंपनीची सालोसाल प्रगति होत आहे. भरमसाट खर्च करून लोकांच्या नजरेंत भरेल अशा प्रकारचें नवीन काम मिळविण्याचा मोह आपण केव्हांच धरला नाहीं आणि म्हणूनच हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांत आपलें जें पहिल्यापासून मानाचें स्थान आहे तें आपण टिकवूं शकलों. अनेक संस्था आपल्या कंपनीकडे मातृसंस्था म्हणून पाहात असतात ही गोष्ट आपणांस दृष्टिआड करून चालणार नाहीं आणि त्यामुळें तर आपल्या कंपनीचें सन्माननीय स्थान कायम राखणेची अधिकच जबाबदारी आपणांवर येऊन पडते आणि ही जबाबदारी आपण निवडून दिलेल्या डायरेक्टरांनीं पूर्णपणें पार पाडली आहे हें नमूद करण्यास मला अभिमान वाटतो.

### सामुदायिक प्रचाराची आवश्यकता

युद्धजन्य परिस्थितीमुळें विमाविषयक मनोवृत्ति जी समाजांत निर्माण झाली आहे ती टिकवून धरली पाहिजे व त्यासाठी सर्व कंपन्यांनीं एकजुटीनें पुढें येऊन विम्याचें महत्त्व पटवून देण्यासाठी सर्व देशभर जोराची मोहीम सुरू केली पाहिजे आणि अशा प्रकारची मोहीम सामुदायिक जाहिरातीचें तत्त्व अमलांत आणून केली तर ती यशस्वी होणें शक्य आहे. युद्धकाळांत हिंदुस्थान सरकारनें युद्धप्रयत्नांची जाहिरात करण्यासाठी केवढे प्रचंड परिश्रम केले ते आपल्या ध्यानांत असतीलच. शहरोंशहरीं, खेडोंपाडीं, जेथें जेथें म्हणून शक्य होतें त्या ठिकाणीं सरकारनें सिनेमाद्वारां, भिंतीपत्रकद्वारां वा अन्य शेंकडों उपायांनीं जाहिरात करून लोकांचें युद्धकुतूहल वाढविलें व युद्धासाठी सैनिक व इतर कामकरी मिळविले. अशाच प्रकारचे प्रयत्न हिंदुस्थानांतील इन्शुअरन्स असोसिएशननें कां सुरू करूं नयेत असा माझा प्रश्न आहे. इन्शुअरन्स असोसिएशननें या दिशेनें जर प्रयत्न केले तर आपली डायरेक्टर मंडळी आपल्या कंपनीवर जो भार पडेल तो आनंदानें उचलतील यांत तिळमात्र संशय नाहीं व बहुजन समाजांत विमाविषयाची आवड उत्पन्न करण्यासाठीं इन्शुअरन्स असोसिएशननें या दिशेनें जरूर प्रयत्न करावेत अशी माझी सूचना आहे.

### चिरमुले इं. इन्स्टिट्यूटचें कार्य

विमाविषयाचें ज्ञान प्रत्यक्ष विमाक्षेत्रांत काम करणाऱ्या मंडळींना मिळावें या उद्देशानें अल्पशी सुरवात आपल्या चिरमुले इन्शुअरन्स इन्स्टिट्यूटमार्फत आपण केलेली आहे. आमची शिक्षणाची व्यवस्था जरी अल्पशी असली तरी देखील आमच्या मंडळींनीं परीक्षेंत मिळवलेलें यश अत्यंत स्पृहणीय आहे. अशा प्रकारचा निकाल साताऱ्याव्यतिरिक्त इतर कोणत्याहि केंद्राचा लागला नाहीं. उत्तरोत्तर हें यशाचें प्रमाण असेंच वाढतें राहील अशी मला आशा आहे व या सर्वांचें श्रेय आपल्या कंपनीचे मॅनेजर श्री. के. वाय. जोशी व त्यांचे सहकारी यांना आहे. पण हें केवळ परीक्षेपुरतें झालें. माझी चिंता एजंट मंडळींना अधिकाधिक विक्रय कलेचें शिक्षण कसें मिळेल यासंबंधींची आहे. सदर बाबतचा विचार आपले एजन्सी मॅनेजर श्री. एल. व्ही. काशीकर हे करीत असून चालूं साल संपण्यापूर्वींच कांहीं तरी प्रयत्न त्या दिशेनें झालेले आपणांस दिसतील अशी मला खात्री वाटते.

### गुंतवणूक व तीवरील व्याज

आपणांस असें आढळून येईल कीं, कांहीं कांहीं नाणावलेल्या कंपन्यांनीहि अजिबात बोनस दिलेलें नाहीं, तर बऱ्याच कंपन्यांना नफा देण्याऐवजीं उलट तोटाच झालेला आहे व त्या दृष्टीनें तुलनात्मक विचार केला तर आपली कंपनी भाग्यशाली आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. आपण आपल्या कंपनीची बोनस देण्याची प्रथा चालूं घटकेपर्यंत तरी टिकविली आहे व ती तशीच टिकवून धरूं अशी आम्हांस उमेद आहे व ती टिकविण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत.

उत्तरोत्तर कमी होत जाणारा व्याजाचा दर व वाढतें खर्चाचें प्रमाण यामुळें गोंधळून जाऊन ज्याला किंचित् सट्टेबाजीचें स्वरूप आहे अशा प्रकारचा व्यवहार करण्याकडे मनःप्रवृत्ति होणें अगदीं स्वाभाविक आहे. पण विमेदारांच्या पैशाचें आपण विश्वस्त आहोंत ही भावना ठेवून या मोहापासून आपण अत्यंत दूर राहिलें पाहिजे.

अर्थात् याचा अर्थ असा नव्हे कीं, आम्ही केवळ जुन्या धोरणासच चिकटून राहिलें पाहिजे. आम्हींहि बदललेल्या परिस्थितींत काय करतां येईल व बिनधोक व फायदेशीर गुंतवणूक कशी व कोठें करतां येईल याचे ठोकताळे घेत आहोंत व याचा परिणाम म्हणून कदाचित् पुढच्या वर्षी आपला व्याजाचा दर किंचित् वाढलेला आपणांस दिसेल.

### सावधगिरी, जागरूकता, नाविन्याभिरुची

कांहीं मंडळींची प्रामाणिक समजूत अशी आहे कीं, कंपनीनें जरा उदारपणाचें धोरण ठेवलें तर वेस्टर्न इंडियाची प्रगति हां हां म्हणतां होईल. या उदार वृत्तीचा अर्थ कंपनीचा पैसा जरा सढळपणानें खर्च करणें असा ते समजतात. पण पैसा खर्च कसा करावा हें सांगण्यास विशेष शिक्षणाची आवश्यकता आहे असें नाहीं. खरें कौशल्य कंपनीचा कारभार सुव्यवस्थितपणें करून पैसा कसा वांचवितां येईल हें पाहण्यांत आहे. भरमसाट खर्च करून नवीन कामांत नेत्रदीपक वाढ दाखविण्याच्या मागें जर आम्हीं लागलों असतों तर भागीदारांचा व विमेदारांचा आम्हीं विश्वासघात केल्यासारखें झालें असतें. ज्या कंपन्यांनीं हें धोरण स्वीकारलें त्यांपैकीं कांहींना पश्चात्ताप करण्याची पाळी आली आहे, तर कांहीं त्यांत नामशेषहि झाल्या आहेत. आपल्या भागांतील एका प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाशीं आपल्या कंपनीतील एका अनुभवी अधिकाऱ्याची गांठ पडली असतां त्या अर्थशास्त्रज्ञानें देखील तुम्ही आपलें आहे तें धोरण सोडूं नका व त्यांतच तुमचें कल्याण आहे असा आदेश दिला. ही गोष्ट मला आपल्या नजरेसमोर ठेवावीशी वाटते. कंपनीचें कार्य ज्या वेळीं केवळ लाखांनींच मोजण्यासारखें होतें त्यावेळीं जीं साधनें आम्ही उपयोगांत आणीत होतों त्याच साधनांनीं आतां कंपनीचें काम कोटीनें वाढलेलें असलें तरी कंपनीचा गाडा पुढें चालला गेला पाहिजे असें कोण म्हणेल? व तो चालेल तरी कसा? कंपनीचें काम वाढूं लागल्याबरोबर नवीन नवीन साधनांची जुळवाजुळव झाली. नवीन नवीन यंत्रसामुग्री आम्हीं उपयोगांत आणली व पुढें जशी प्रगति होईल तशीं जरूरीप्रमाणें आणखी नवीन नवीन साधनें उपयोगांत आणूं. काळाच्या ओघाबरोबर आमचींहि पावलें निश्चितपणें व धीरगंभीर रीतीनें पुढें पडत आहेत. अवास्तव धावपळ वा गाजावाजा आम्ही करीत नाहीं व करण्याची जरूरी नाहीं.

## शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., पुणें ५ )

दोन जूनची देशाची फाळणी करणारी योजना दोन्ही प्रमुख राजकीय पक्षांनीं मान्य केल्यापासून नऊ महिन्यांत डबघाईस आलेला बाजार थोडासा सांवरला गेला. टाटा डिफर्ड १७६० पर्यंत खाली गेला होता तो २००० पर्यंत चढून तेथेंच आसपास स्थिर आहे. या मानानेंच बाकीचे भावहि आतां स्थिर झाले आहेत. ज्या राजकीय कारणांमुळेंच बाजारचें बूड निसटलें होतें, तें कारण यापुढें न उरल्यानें मंदी संपली असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण पुन्हां तेजी सुरू होण्याला मात्र अनेक अडथळे उत्पन्न झाले आहेत. देशांतील मजूर वर्गाचा असंतोष परमावधीस गेला असून यापूर्वींच बऱ्याच कोळशाच्या खाणी आणि टेलको यामध्यें संप चालू झालेले आहेत. टाटा स्टीलचा कामकरी वर्ग आणि चालक यामध्यें बोनससंबंधी बेबनाव उत्पन्न झाला असून आलटून पालटून संप अगर टाळेबंदीच्या बातम्या येत आहेत व त्यांवर बाजार हेलकावे खात आहे. टाटानें. मजुरांच्या मागण्या मान्य केल्यास नजीक येऊन ठेपलेल्या डिव्हिडंडला बरीच कात्री लागणार या भीतीनें गुंतविणारे अस्वस्थ असून भाव खालीं असून सुद्धां खरेदीस पुढें येत नाहींत. आमच्या मतें टाटा स्टीलचे चालक कौशल्यानें मार्ग काढतील आणि थोडी देवाण-घेवाण करून संप अथवा टाळेबंदी टाळतील आणि बाजार झटक्यांत वर येईल. गुंतविणारांना ऑर्डिनरी ३८० च्या आसपास उचलण्यास उत्तम वाटतो. गिरण्यांच्या बाबतींत कापडनियंत्रण उठविण्याच्या बाबतींत मुंबई सरकारनें नेट धरला असून दिल्लीला टेक्स्टाईल बोर्डाच्या बैठकी चालू आहेत. तलम सुताचे भाव कायम ठेवले जाऊन भरड्या सुताचे वाढविले जातील अशी अपेक्षा आहे. या दृष्टीनें गिरण्यांच्या शेअर्सचे भाव नेट धरून आहेत. गिरण्यांपैकीं गोकाक ३१०–१५ च्या आसपास, डाइंग १००० च्या आसपास, विष्णु ५५० च्या आसपास घेण्यास उत्तम वाटतात. संकीर्ण शेअर्सपैकीं केवळ सट्ट्याकारितां धाडस असणाऱ्या मंडळींनीं बॉम्बे बर्मा ४५० च्या आसपास जरूर पकडावा. कलकत्त्याच्या इंडिया स्टीम-शिप कंपनीला सहा अमेरिकन जहाजें मिळालीं असून कांहींची वहातूक सुरू झाली आहे. या कंपनीच्या उज्ज्वल भविष्याबद्दल विश्वास वाटतो. सध्यां भाव १६ च्या आसपास असून कंपनीचा अहवाल बाहेर पडल्यानंतर या शेअरमध्यें विशेष हालचाल होऊन २०–२२ पर्यंत तो चढावा असें वाटतें.

---

**ब्रिटनमध्यें घड्याळांचा नवीन धंदा**—ब्रिटनमध्यें दुसऱ्या महायुद्धापूर्वी घड्याळें तयार करण्याचा धंदा जवळ जवळ नव्हताच. १९३९ सालीं ब्रिटनमध्यें ८० लाख हातांतील घड्याळें व ५० लाख मोठीं घड्याळें आयात करण्यांत आलीं. युद्धाच्या गरजेमुळें ब्रिटनमध्यें घड्याळांचे ७६ कारखाने नव्यानें उभारण्यांत आले आतां घड्याळें बनविण्याच्या धंद्यांत प्रभुत्व मिळविण्यासाठी ब्रिटिश सरकारनें योजना आखली आहे. हल्लीं ब्रिटनच्या घड्याळाच्या उत्पादनापैकीं ७५ टक्के उत्पादन निर्यात करण्यांत येतें.

**ब्रिटिश व्यापाऱ्याचे महत्त्वाचे उद्‌गार**—असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्सचे एक माजी अध्यक्ष, सर हॅरी टौन्सेंड, नुकतेच इंग्लंडला परत गेले. ब्रिटिश व्यापाराला हिंदुस्थानांत अजून क्षेत्र असून, ब्रिटिश व्यापारी हितसंबंध हिंदुस्थानांतून बाहेर पडण्याच्या विचारांत नाहींत, असें त्यांनीं एका मुलाखतींत उद्‌गार काढले.


**दि रत्नाकर बँक लिमिटेड.**

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ शाहुपुरी, ३ सांगली, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.


चेअरमनः—नामदार बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी. डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,१३,६०० |
| खेळतें भांडवल अंदाजें | ३५,००,००० |

—: अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—







आरको
प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें

श्री श्री श्री श्री श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टके
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.